6

Add

स्वातंत्र्य सैनिक आणि त्याची/तीचा पती/ पत्नी अथवा एक साथीदार यास वर्षभर विनामुल्य प्रवास सवलतीमुळे होणा-या खर्चाची प्रतिपूर्ती.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-पीओजेस-१०९१/१४५९/प्र.क्र.१८५/९१/स्वासैकक्ष,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ जून, १९९१.

वाचा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीओजेस-१०९०/प्र.क्र.७७/ ९०/स्वासैकक्ष, दिनांक २६ डिसेंबर, १९९०.

शासन निर्णय:- सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओजेस-१०९०/प्र.क्र.७७/९०/स्वासैकक्ष, दिनांक २६.१२.९० अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयाच्या परिच्छेद ४ अन्वये सदर योजनेसाठी होणारा खर्च कोणत्या लेखाशीर्षाखाली भागविण्यात यावा व तो कसा भागविण्यात यावा तसेच शासनाने महामंडळास दरवर्षी खर्चाची प्रतिपूर्ती कशाप्रकारे करावी या संबंधी स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील असे नमूद करण्यात आले होते.

२. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, सर्व जिल्हाधिका-यांनी किती स्वातंत्र्य सैनिकांनी वर्षभर विनामूल्य प्रवासासाठी पास घेतले आहेत याची माहिती आगार व्यवस्थापकांकडून उपलब्ध झाल्यावर मगच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास प्रत्येक स्वातंत्र्य सैनिकाच्या मागे रु.१,०००/- याप्रमाणे खर्चाची प्रतिपूर्ती करावी. राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून पास घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांची यादी उपलब्ध होण्यापूर्वी खर्चाची प्रतिपूर्ती केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. प्रत्येक तिमाहीत जिल्ह्यातील किती स्वातंत्र्य सैनिकांनी वर्षभर विनामूल्य सवलतीचा फायदा घेतला व किती रक्कम महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास अदा करण्यात आली याची ३० जून, ३० सप्टेंबर, ३१ डिसेंबर व ३१ मार्च अखेरची माहिती या विभागास पाठवावी.

३. याबाबीवर होणारा खर्च, "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण [१०२][१] स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती इत्यादींना निवृत्तीवेतने मागणी क्रमांक ए-१४" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो मंजूर अनुदानातून भागवावा.

[कृ.मा.प.]

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-सीआर-५१७/व्यय-४, दिनांक २१.५.९१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
[ व. ज. गांवकर ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
मा. अध्यक्ष, मा. सभापती, मा. सदस्य सचिव व इतर सदस्य, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
उपाध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
उप महाव्यवस्थापक [वाहतूक] महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र राज्य, मुंबई [२ प्रती],
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र राज्य, नागपूर [२ प्रती],
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक/अपर मुख्य सचिवांचे स्वीय सहायक,
सर्व विशेष सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक,
सर्व मंत्रालयीन विभाग/सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई/निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी/वित्त विभाग, व्यय-४, मंत्रालय, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग, का. क्र. २५, मंत्रालय, मुंबई,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
निवड फाईल.